myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

# प्राचीन व आधुनिक संस्कृती : तुलनात्मक अभ्यास

**डॉ. पी.आर.पवार**

माजी प्राचार्य श्रीमती सी. बी. शहा महिला महाविद्यालय, सांगली, महाराष्ट्र.

**सौ. ज्योती दिपक बोटकोंडले**

संशोधक विद्यार्थिनी, एस .एन. डी .टी महिला विद्यापीठ, चर्चगेट,मुंबई.

**गोषवारा (Abstract)**

या संशोधन प्रबंधामध्ये प्राचीन आणि आधुनिक संस्कृतींचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. संस्कृती ही कोणत्याही समाजाची मूलभूत ओळख असते. संस्कृती ही समाजाच्या मूल्यव्यवस्था, परंपरा, श्रद्धा, कला, भाषा, सामाजिक संस्था आणि तंत्रज्ञान यांचा एकत्रित आविष्कार आहे. प्राचीन संस्कृतीत धर्म, नैतिकता, परंपरा आणि सामूहिक जीवनाला विशेष महत्त्व होते; तर आधुनिक संस्कृतीत व्यक्तिस्वातंत्र्य, विज्ञान, तंत्रज्ञान, आणि जागतिकीकरण यांना अग्रक्रम मिळाला आहे. या अभ्यासात ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक घटकांचा सखोल विचार करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये दोन्ही संस्कृतींच्या साम्य-भेदांचे विश्लेषण करून त्यांचा समाजावर होणाऱ्या परिणामांचा सखोल विचार करण्यात आला आहे. या अभ्यासातून असे दिसून येते की प्राचीन संस्कृतीने समाजाला मूल्याधिष्ठित दिशा दिली, तर आधुनिक संस्कृतीने विकास आणि प्रगतीचा वेग वाढवला. तथापि, आधुनिकतेमुळे नैतिक मूल्यांची घसरण आणि पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे संतुलित विकासाचा दृष्टिकोन आवश्यक आहे. प्राचीन संस्कृतीतील नैतिकता, सामूहिकता आणि परंपरा यांचा समन्वय आधुनिक संस्कृतीतील विज्ञान,

तंत्रज्ञान आणि स्वातंत्र्याशी साधल्यास समाज अधिक सुसंस्कृत आणि प्रगतिशील होऊ शकतो.

## शोध संज्ञा

संस्कृती, प्राचीन संस्कृती, आधुनिक संस्कृती, सामाजिक, मूल्यव्यवस्था, तंत्रज्ञान.

## प्रस्तावना

संस्कृती हा समाजाचा आत्मा आहे. समाजातील लोकांचे विचार, श्रद्धा, मूल्यव्यवस्था, परंपरा, कला, साहित्य, तंत्रज्ञान आणि जीवनशैली यांचा एकत्रित परिणाम म्हणजे संस्कृती.[१] समाजात राहत असताना मानवाने काही नियम, परंपरा, मूल्ये व जीवनपद्धती स्वीकारल्या आणि त्यातून संस्कृतीची निर्मिती झाली. संस्कृती ही कालानुसार बदलत जाते. इतिहासाच्या प्रवासात प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत समाजात अनेक स्थित्यंतरे झाली. या बदलांचा थेट परिणाम संस्कृतीवर झाला. त्यामुळे प्राचीन व आधुनिक संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

## संशोधनाची गरज

प्राचीन आणि आधुनिक संस्कृतीतील बदल समजून घेण्यासाठी संशोधन आवश्यक आहे. जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि शहरीकरणामुळे समाजाच्या मूल्यव्यवस्थेत मोठे परिवर्तन झाले आहे. या बदलांचा सामाजिक आणि आर्थिक जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे गरजेचे आहे.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

## संदर्भ साहित्याचा आढावा

- राम आहुजा (२०१८) यांनी भारतीय समाज या ग्रंथात आधुनिकतेमुळे सामाजिक रचना, शिक्षण आणि कुटुंबव्यवस्थेत झालेले बदल स्पष्ट केले आहेत.[१२]
- दत्त व सुंदरम (२०१९) यांच्या Indian Economy या पुस्तकात १९९१ नंतरच्या उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांचे विश्लेषण केले आहे.[१३]
- एन. जे. शिंदे (2018) यांनी भारतीय शिक्षणाचा विकास मध्ये शिक्षणातील तंत्रज्ञान, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि समावेशकतेवर भर दिला आहे.[१४]

या सर्व भारतीय लेखकांच्या साहित्याचा अभ्यास करता असे दिसून येते की प्राचीन संस्कृतीने समाजाला मूल्याधिष्ठित पाया दिला, तर आधुनिक संस्कृतीने सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले.

## संशोधन उद्दिष्टे

१. प्राचीन संस्कृतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
२. आधुनिक संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये अभ्यासणे.
३. दोन्ही संस्कृतींतील साम्य व भेदांचा अभ्यास करणे.
४. सामाजिक व आर्थिक परिणामांचे विश्लेषण करणे.
५. संतुलित सांस्कृतिक विकासासाठी उपाय सुचवणे.

## गृहीतके

१. प्राचीन संस्कृती समाजात नैतिक मूल्ये अधिक दृढ करत होती.
२. आधुनिक संस्कृतीमुळे तांत्रिक प्रगतीला चालना देते.
३. आधुनिकतेमुळे व्यक्तिवाद वाढला आहे.
४. प्राचीन आणि आधुनिक संस्कृतींचे समन्वय समाजासाठी उपयुक्त आहे.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

## संशोधन पद्धती

या अभ्यासासाठी ऐतिहासिक आणि तुलनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. सदर संशोधनांत दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध ग्रंथ, संशोधन लेख, शैक्षणिक संदर्भग्रंथ यांचा अभ्यास करून माहिती संकलित करण्यात आली आहे.

## संशोधनाच्या मर्यादा

१. हा अभ्यास दुय्यम स्रोतांवर आधारित आहे.

२. प्राचीन संस्कृतीविषयी उपलब्ध माहिती मर्यादित आणि ऐतिहासिक स्रोतांवर अवलंबून आहे.

३. आधुनिक संस्कृती सतत बदलत असल्यामुळे तिचे परिणाम निश्चित स्वरूपात मांडणे कठीण आहे.

४. सामाजिक आणि आर्थिक परिणाम हे सर्व समाजात सारखे नसतात ते प्रदेशानुसार बदलू शकतात.

## माहितीचे विश्लेषण

### संस्कृतीची संकल्पना व अर्थ

समाजशास्त्रज्ञ ई. बी. टायलर यांच्या मते, संस्कृती म्हणजे ज्ञान, श्रद्धा, कला, नीतिनियम, कायदे, रूढी व समाजाचा सदस्य म्हणून मानवाने आत्मसात केलेल्या सवयींचा एक गुंतागुंतीचा संपूर्ण समूह होय. संस्कृती ही शिकवली जाते, ती पिढ्यान्पिढ्या पुढे जाते आणि काळानुसार बदलत राहते. त्यामुळे संस्कृती ही स्थिर नसून गतिशील आहे.[२]

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

## प्राचीन संस्कृती : स्वरूप व वैशिष्ट्ये

प्राचीन संस्कृतीचा कालखंड साधारणतः मानवाच्या आरंभिक सामाजिक जीवनापासून मध्ययुगीन काळापर्यंत मानला जातो. या संस्कृतीची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

१. धार्मिक अधिष्ठान

प्राचीन समाजात धर्माला अत्यंत महत्त्व होते. धर्म हा सामाजिक नियंत्रणाचा प्रमुख घटक होता. मानवाचे दैनंदिन जीवन धार्मिक विधी, यज्ञ, पूजा व व्रतवैकल्यांशी जोडलेले होते.

२. कुटुंबसंस्था

संयुक्त कुटुंबपद्धती ही प्राचीन संस्कृतीची प्रमुख रचना होती. कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र राहत, एकत्र श्रम करत आणि सामूहिक जबाबदाऱ्या पार पाडत. यामुळे सामाजिक एकात्मता व सहकार्य वाढत असे.[३]

३. शिक्षणव्यवस्था

गुरुकुल पद्धतीत विद्यार्थ्यांना शिस्त, नैतिकता आणि आध्यात्मिक शिक्षण दिले जात असे.[४]

४. अर्थव्यवस्था

प्राचीन संस्कृतीची अर्थव्यवस्था मुख्यतः शेती, पशुपालन व हस्तकलेवर आधारित होती. हेच उपजीविकेचे प्रमुख साधन होते. उत्पादन मर्यादित होते आणि उपभोगापेक्षा गरजांना अधिक महत्त्व दिले जात असे.[५]

५. गुरू-शिष्य परंपरा

शिक्षणपद्धती गुरू-शिष्य परंपरेवर आधारित होती. शिक्षणाचा उद्देश केवळ उपजीविकेपुरता मर्यादित नसून चारित्र्यनिर्मिती व नैतिक मूल्यांचा विकास करणे हा होता.[६]

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

६. निसर्गाशी सुसंवाद

प्राचीन मानव निसर्गावर अवलंबून होता. त्यामुळे निसर्गपूजा, वृक्षसंवर्धन व पर्यावरणसंरक्षण याला महत्त्व दिले जात असे.[७]

## आधुनिक संस्कृतीची वैशिष्ट्ये

औद्योगिक क्रांतीनंतर आणि विशेषतः विसाव्या शतकात आधुनिक संस्कृतीचा उदय झाला. या संस्कृतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

१. विज्ञान व तंत्रज्ञान

औद्योगिक क्रांतीनंतर विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वेगाने विकास झाला. संगणक, इंटरनेट आणि उपग्रह तंत्रज्ञानामुळे समाज जागतिक पातळीवर जोडला गेला.

२. व्यक्तिवाद

आधुनिक समाजात व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता, लोकशाही मूल्य आणि व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य दिले जाते. “मानवी हक्क” ही संकल्पना आधुनिक संस्कृतीचे केंद्रबिंदू आहे.[८]

३. शहरीकरण

शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढीस लागली आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य वाढले असले तरी कुटुंबातील भावनिक बंध काही प्रमाणात सैल झाले आहेत. औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढले.[९]

४. शिक्षणातील परिवर्तन

डिजिटल शिक्षण, संशोधन आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांना महत्त्व प्राप्त झाले आहे.[१०]

५. औद्योगिक व सेवा क्षेत्रप्रधान अर्थव्यवस्था

आधुनिक अर्थव्यवस्था उद्योग, व्यापार, सेवा व माहिती-तंत्रज्ञानावर आधारित आहे. उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते आणि उपभोगसंस्कृती वाढीस लागली आहे.[११]

## प्राचीन व आधुनिक संस्कृती : तुलनात्मक अभ्यास

पूर्वीचा समाज आणि आजचा समाज यामध्ये मोठा बदल दिसून येतो. प्राचीन काळात लोकांचे जीवन साधे, शांत आणि निसर्गाशी जोडलेले होते. लोक शेतीवर अवलंबून होते. कुटुंब मोठे असायचे आणि सर्व सदस्य एकत्र राहत असत. धर्म, परंपरा आणि संस्कार यांना जीवनात महत्त्वाचे स्थान होते. भारतामधील वैदिक काळात धर्म व कर्तव्यभाव यांना विशेष महत्त्व होते. त्या काळात शिक्षण गुरुकुलात दिले जाई. विद्यार्थ्यांना शिस्त, संयम आणि नैतिकता शिकवली जाई. मनोरंजनासाठी लोकनृत्य, कथा, कीर्तन यांसारख्या गोष्टी असत. समाजातील नातेसंबंध घट्ट होते.

आजच्या आधुनिक काळात चित्र बदलले आहे. विशेषतः पाश्चिमात्या देशात सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर समाजात मोठे परिवर्तन झाले. लोक शहरांकडे स्थलांतर करू लागले. संयुक्त कुटुंबाऐवजी लहान कुटुंब पद्धती वाढली. आधुनिक समाज विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित आहे. संगणक, मोबाईल, इंटरनेट यामुळे जीवन अधिक सोयीस्कर झाले आहे. शिक्षण डिजिटल झाले आहे. स्त्रियांना शिक्षण व नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. तथापि, आधुनिक जीवन वेगवान आणि तणावपूर्ण झाले आहे. नातेसंबंध काही प्रमाणात कमी झाले आहेत. पर्यावरणीय समस्या वाढल्या आहेत.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

## सामाजिक आणि आर्थिक परिणाम

प्राचीन आणि आधुनिक या दोन्ही संस्कृतींचे समाजावर सामाजिक आणि आर्थिक परिणाम झालेले दिसतात. प्राचीन संस्कृतीत समाज एकत्रित आणि मूल्याधिष्ठित होता. संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे एकोपा, सुरक्षितता आणि परस्पर सहकार्य वाढत असे. धर्म आणि परंपरांमुळे समाजात शिस्त आणि नैतिकता टिकून राहत होती. आर्थिकदृष्ट्या प्राचीन समाज शेती आणि हस्तकलेवर आधारित होता. स्थानिक उत्पादन आणि साधे जीवन यामुळे गरजा मर्यादित होत्या आणि पर्यावरणावर कमी ताण येत होता.

आधुनिक संस्कृतीत सामाजिक बदल मोठ्या प्रमाणात झाले. व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता आणि शिक्षणाचा प्रसार यामुळे समाज अधिक प्रगत झाला. परंतु संयुक्त कुटुंब पद्धती कमी झाली आणि नातेसंबंधांमध्ये काही प्रमाणात अंतर आले. आर्थिकदृष्ट्या औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे रोजगाराच्या संधी वाढल्या आणि जीवनमान उंचावले. मात्र, स्पर्धा, बेरोजगारी, आर्थिक विषमता आणि पर्यावरणीय समस्या याही वाढल्या.

म्हणूनच दोन्ही संस्कृतींचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम मिश्र स्वरूपाचे आहेत. प्राचीन संस्कृतीने स्थैर्य आणि मूल्ये दिली, तर आधुनिक संस्कृतीने विकास आणि समृद्धी दिली.

## निष्कर्ष

संतुलित सांस्कृतिक विकासासाठी प्राचीन संस्कृतीतील नैतिक मूल्ये आणि आधुनिक संस्कृतीतील वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समन्वय करणे आवश्यक आहे. परंपरा जपत प्रगती स्वीकारली तर समाज अधिक समृद्ध आणि शाश्वत होईल.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

## शिफारशी

प्राचीन आणि आधुनिक संस्कृतीतील चांगले गुण स्वीकारून समाजाचा समतोल विकास साधण्यासाठी खालील उपाय उपयुक्त ठरू शकतात:

१. शाळा-महाविद्यालयांमध्ये केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे तर सामाजिक जबाबदारी, संस्कार आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण दिले पाहिजे. प्राचीन संस्कृतीतील सदाचार आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय करणे आवश्यक आहे.

२. संयुक्त कुटुंबाची परंपरा जपता येत नसली तरी कुटुंबातील संवाद, एकोप्याची भावना आणि आदर वाढवणे गरजेचे आहे.

३. तंत्रज्ञानचा अतिरेक टाळणे आवश्यक आहे.  मोबाईल, इंटरनेट यांचा वापर ज्ञान आणि विकासासाठी करावा.

४. प्राचीन संस्कृतीत निसर्गाला पूजनीय मानले जात होते. त्याच भावनेने झाडे लावणे, पाणी वाचवणे आणि प्रदूषण कमी करणे आवश्यक आहे.

५. सण, उत्सव, लोककला यांचे जतन करताना आधुनिक विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा.

६. आधुनिक संस्कृतीने दिलेली समानतेची भावना टिकवून ठेवावी आणि समाजात भेदभाव दूर करावा.

७. धर्म, जात, भाषा यापेक्षा मानवतेला प्राधान्य देऊन समाजात बंधुता वाढवावी.

---

## संदर्भ सूची

१. कर्वे इरावती भारतीय संस्कृती, देशमुख प्रकाशन, पुणे २०१०, पृ. १२.
२. ई. बी. टायलर, Primitive Culture, Vol. 1, London: John Murray, १८७१, पृ. १-५.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

३. जी. एस. घुर्ये, भारतीय समाजाची रचना, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६१, पृ. ८२.

४. अल्टेकर, अ. स. (१९९८). Education in Ancient India. Motilal Banarsidass, पृ,१२१.

५. कोसांबी, दा. ध. (२००२). प्राचीन भारताचा इतिहास. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ८८.

६. रा. ना. जोशी, भारतीय संस्कृतीचा इतिहास, पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन, २००५, पृ. ४५-५२.

७. ठाकूर, रवींद्रनाथ. (2001). भारतीय संस्कृतीचे स्वरूप. साहित्य अकादमी, पृ. 59.

८. ग. प्र. प्रधान, आधुनिक समाजशास्त्र, मुंबई: कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २०१२, पृ. ८९

९. राम आहुजा, भारतीय समाज, जयपूर: रावत पब्लिकेशन, २०१८, पृ. १५४

१०. एन. जे. शिंदे, भारतीय शिक्षणाचा विकास, २०१८, पृ. १३४.

११. अ. रा. देशमुख, आधुनिक समाजशास्त्र, नागपूर: विद्या प्रकाशन, २०१२, पृ. ११२-११८.

१२. राम आहुजा, भारतीय समाज, जयपूर: रावत पब्लिकेशन, २०१८.

१३. दत्त व सुंदरम, Indian Economy, नवी दिल्ली, S. Chand & Co., २०१९.

१४. एन. जे. शिंदे, भारतीय शिक्षणाचा विकास, मुंबई: हिमालय प्रकाशन, २०१८.